# सारा गौरव गृह प्रकल्पाच्या बांधकामास उत्साहात प्रारंभ

तुळजापूर, दि.१९: सारा टॉवर्स प्रा. लि. औरंगाबाद यांच्या येथील सारा गौरव गृह प्रकल्पाच्या दुसऱ्या टप्प्यातील बांधकामांचा शुभारंभ पुजारी मंडळाचे अध्यक्ष मारुतीराव क्षीरसागर यांच्याहस्ते व तुळजाभवानी अभियांत्रिकीचे प्राचार्य तात्यासाहेब जगताप यांच्या अध्यक्षतेखाली करण्यात आला. प्रारंभी क्षीरसागर व प्राचार्य जगताप यांचे स्वागत साराचे अभियंता प्रभाकर पाटील यांनी केले. विधिवत पूजन करुन बांधकामाचे साहित्याची भरणीकरुन पायाभरणी मान्यवरांच्या हस्ते करण्यात आली. सारातील ज्येष्ठ नागरिक शालीग्राम कुलकर्णी, प्रभाकर पाटील, लंगडे अण्णा यांच्याहस्ते मान्यवरांचा सत्कार करण्यात आला. खुरद यांनी प्रास्ताविक केले. संजय यांनी आभार मानले. यावेळी मारुती माने, सचिन कांबळे, अजय धोतरकर, मुकुंद कमठाणकर आदी उपस्थित होते.